April-May-June- 2024 E-ISSN : 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

International Research Fellows Association's

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Vol.- 11, ISSUE - 02

## Multidisciplinary Issue




**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] India.

**Executive Editors :**
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Smt. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Swati Lawange, Yeola (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with OKEN Scanner

April-May-June-2024 E-ISSN : 2348-7143

International Research Fellows Association's

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Vol.- 11, ISSUE - 02

## Multidisciplinary Issue

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] India.

**Executive Editors :**
**Dr. Tejesh Beldar,** Nashikroad (English)
**Dr. Gajanan Wankhede,** Kinwat (Hindi)
**Smt. Bharati Sonawane,** Bhusawal (Marathi)
**Dr. Swati Lawange,** Yeola(Marathi)
**Dr. Rajay Pawar,** Goa (Konkani)

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible, answerable and accountable for their content, citation of sources and the accuracy of their references and bibliographies/references. Editor in chief or the Editorial Board cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights. Any legal issue related to it will be considered in Yeola, Nashik (MS) jurisdiction only.*

***- Chief & Executive Editor***

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : **www.researchjourney.net**

***Cover Photo Source :** *Internet- India Won T20 World Cup Trophy*

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 1000/-



Scanned with OKEN Scanner

# Editorial Board

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV's Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
**Dr. Tejesh Beldar,** Nashikroad (English)
**Dr. Gajanan Wankhede**, Kinwat (Hindi)
**Mrs. Bharati Sonawane**, Bhusawal (Marathi)
**Dr. Swati Lawange,** Yeola(Marathi)
**Dr. Rajay Pawar,** Goa (Konkani)

**Co-Editors -**
- **Prof. Mohan S. -** Dean faculty of Arts, Delhi University, **Delhi, India**
- **Prof. Milena Brotaeva -** Head, Classical East Department, Sofia University, **Sofia, Balgeria**
- **Dr. R. S. Sarraju –** Center for Translation Studies, University of Hydeabad, **Hydrabad, India**
- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar -** BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik. **[M.S.] India**
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Prof. Vinay Madgaonkar -** Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik -** Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh -** Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sanjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari **[M.S.]**
- **Prof. Vijay Shirsath**- Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.] India**
- **Dr. P. K. Shewale** - BoS Member (SPPU), MGV's LVH College, Panchavati-Nashik **[M.S.] India**
- **Dr. Hitesh Brijwasi -** Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar **[M.S.] India**
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.] India**
- **Prof. K. M. Waghmare -** Librarian, Anandibai Raorane College, Sawantwadi **[M.S.] India**
- **Prof. Vidya Surve-Borse-** MGV's LVH Arts, Sci. & Com.College, Panchavati-Nashik **[M.S.] India**

**Advisory Board -**
- **Dr. Marianna Kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare -** Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur -** Chairman, BoS, Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. B. V. Game** - Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

**Review Committee -**
- **Dr. J. S. More** - BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**- BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali,** HoD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** - Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar -** M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.
- **Dr. R.D. Shinde,** HoD, Marathi, KPG Arts, Commerce & Science College, Igatpuri.

**Published by –**
© **Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik**
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258



Scanned with OKEN Scanner

# INDEX


| No. | Title of the Paper / Author's Name | Page No. |
|---|---|---|
| | **English Section** | |
| 1 | Reading the Pastiche of Communication in Wasfiyat : A Tale of Soul — **Dr. R. P. Singh** | 05 |
| 2 | Eco-Feminism in the Poems of North-East Indian Poetess Mamang Dai — **Pramod Gulgule** | 09 |
| 3 | Modernisation : An Encroachment? A Discourse of Tribal Consciousness with Special Reference to the Poems of Dr. Santosh Rathod — **Dr. Vidya Verma, Dr. Yogita Verma** | 13 |
| 4 | Language, Arts and Culture in National Education Policy 2020 — **Makarand Joshi** | 16 |
| 5 | The Impact of Cultural Nuances, Politics and Economies on the Global Bio-pharmaceutical Businesses : Lessons of Vaccines and Biopharmaceuticals in the Last Decade — **Dr. Salil Sabnis, Dr. Anil Dongre** | 19 |
| 6 | The Role and Impact of Artificial Intelligence in Human Resource Management : A Comprehensive Review — **Ms. Faroza Kazi, Dr. Richa Modiyani** | 27 |
| 7 | A Study of Crop Combination Regions in Sangli District (Maharashtra) — **Dr. Amol More, Dr. P. V. Patil** | 39 |
| 8 | Emerging Trade in Green Finance: Opportunities and Challenges — **Dr. Sangita Hadge** | 44 |
| 9 | Changing Irrigation and Agricultural Landuse Pattern of Maharashtra (India) — **Dr. Dattatray Shinde** | 48 |
| 10 | Teaching Aptitude : A Vital Tool for Educational Innovation — **Mr. Ashokkumar Prajapati** | 53 |
| 11 | A Study of the Use of E-Learning Facilities by Undergraduate Students — **Pallavi Bhoi** | 58 |
| 12 | Effects of Excessive Use of Cell Phones on Children — **Dr. Manjusha Kharole** | 66 |
| 13 | Comparative Magnetic Behavior of Semicoductors Bismuth Trisulphide, Bismuth Iodate and Bismuth Triiodide Crystals — **T. K. Patil** | 68 |
| 14 | Factors Affecting the Second Language Learning — **Pramod Gulgule** | 76 |
| | **हिंदी विभाग** | |
| 15 | रामानुजाचार्य: सामाजिक चिंतन — **डॉ. संतोष पवार** | 82 |
| 16 | दुष्यंत कुमार की ग़ज़लों में अभिव्यक्त आम आदमी की वेदना — **डॉ. रवींद्र ठाकरे** | 87 |
| 17 | मोहन राकेश के साहित्य में यथार्थ बोध — **डॉ. संतोष पवार** | 91 |
| 18 | डॉ.बृजेश सिंह की ग़ज़लों में प्लास्टिक विमर्श — **डॉ. रवींद्र ठाकरे** | 96 |
| 19 | ओलंपिक खेलों में भारतीय महिलाओं का योगदान — **अलका जाधव, सजित खांडेकर** | 99 |
| | **मराठी विभाग** | |
| 20 | पालघर जिल्ह्यातील आदिवासींचे विधी आणि बदलत गेलेली लग्नपध्दती — **डॉ. राजू शनवार** | 102 |
| 21 | लोकसाहित्य समृद्ध करणारे नाशिक जिल्ह्यातील आदिवासी बांधवांचे प्रमुख लोकोत्सव — **डॉ. सुनील जाधव** | 109 |
| 22 | नारदनीतीमध्ये वर्णन केलेली आदर्श राजाची लक्षणे — **योगेश खालकर, डॉ. रोशन भगत** | 115 |
| 23 | महात्मा गांधीजी यांचे साहित्यिक योगदान — **डॉ. शकुंतला भारंबे** | 120 |
| 24 | सावित्री : एक काव्यात्मक कादंबरी — **डॉ. अंजली मस्करेन्हस** | 127 |




Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 25 | संदीप खरे यांचे काव्य क्षेत्रातील योगदान | **डॉ. फुला बागूल, श्री. योगेश सोनवणे** | 132 |
| 26 | नव्वदोत्तरी मराठी कविता : अभिव्यक्ती आणि आस्वाद | **दशरथ शिंदे, प्रा.डॉ. मिलिंद कसबे** | 140 |
| 27 | नंदीवाले जमातीच्या लोककथेतील समाज प्रबोधन | **प्रा. तुकाराम जाधव** | 146 |
| 28 | मराठी लेखिकांचे ललित गद्य | **डॉ. शकुंतला भारंबे** | 150 |
| 29 | भारतातील सविनय कायदेभंग चळवळीत दिंडोरी तालुक्याचे योगदान | **प्रा. चंद्रप्रकाश कांबळे, डॉ. दिपक वेडे** | 158 |
| 30 | नशिराबाद गावाचे धार्मिक महत्त्व - ऐतिहासिक अभ्यास | **डॉ. दिपक किनगे** | 162 |
| 31 | भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वे : एक दृष्टिक्षेप | **डॉ. एच. एस. कुचेकर** | 167 |
| 32 | जैविक बियाणे व खत तयार करण्याची प्राचीन भारतीय पध्दती व आजची उपयोगिता | **डॉ. दर्शना सायम** | 174 |
| 33 | मनोशारीरिक व्याधीग्रस्तांचे तणाव व्यवस्थापन तंत्राद्वारे होणारे बदल अभ्यासणे | **डॉ. बी. यु. पवार** | 181 |
| 34 | اردو زبان کی اشاعت وترویج اور روزگار | **Dr. Azmat Anwar Dalal** | 185 |

# नशिराबाद गावाचे धार्मिक महत्त्व - ऐतिहासिक अभ्यास

**डॉ. दिपक दिनकर किनगे**
सहाय्यक प्राध्यापक आणि इतिहास विभाग प्रमुख
डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव

नशिराबाद हे जळगाव जिल्ह्यातील सुरत-नागपूर-कलकत्ता या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वर वसलेले ऐतिहासिक गाव आहे. या गावची लोकसंख्या २६,१३१ (जनगणना २०११ ) एवढी आहे. त्यापैकी १२,६४० महिला तर १३६७१ पुरुष लोकसंख्या आहे. जळगाव तालुक्यातील नशिराबाद हे गाव सर्वाधिक लोकसंख्येचे आहे.[१] नशिराबाद गावात हिंदु, मुसलमान, बौध्द व जैन धर्माचे लोक राहतात. त्यात माळी, लेवा पाटीदार, मराठा, ब्राह्मण, वाणी, चौबे, गुजराती, मारवाडी, विणकर, साळी, कोष्टी, चांभार, महार, तेली, वराडी, मण्यार, मोमीन व इतर अनेक जाती-जमाती आहेत.[२]

नशिराबाद हे वाकी या छोटया नदीकाठी वसलेले गाव आहे. नशिराबाद हे उत्तर भारतात जाणाऱ्या रस्त्यावरील मोक्याचे ठिकाण होते. स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज व पेशवा पहीला बाजीराव यांनी उत्तर भारतात जायच्या वेळी नशिराबाद येथे एक एक रात्र मुक्काम केला होता, अशी माहिती गावकऱ्याकडून प्राप्त होते.[३]

नशिराबाद गावात १६ हनुमान मंदिरे व १६ विहिरी होत्या, म्हणून या गावाला सोळनिंभोरे असे नाव होते, अशी लोकवदंता आहे.[४] नशिराबाद पूर्वी सोळा गावांचे मुख्य ठाणे होते. म्हणून त्यास सोळनिंभोरे नावाने ओळखले जात होते.[५] खानदेशाचा सुलतान नसिरखान (इ.स. १३९९-१४३७) याच्या नावावरुन या गावास 'नशिराबाद' हे नाव प्राप्त झाले. पूर्वीच्या सोळनिंभोरे गावास खानदेशचा सुलतान मलिक फारुकीचा मुलगा नसिरखान फारुकीच्या नावावरून 'नशिराबाद' असे नाव पडले.[६]

सातमाळयातील भिल्लांनी नशिराबाद अनेक वेळा लुटले. सन १८०१ मध्ये झुबा नामक लुटारूने व सन १८०३ पूर्वी पेशव्यांच्या एका अधिकाऱ्यानेही ते लुटले. हे गाव पुरंदरे नामक गृहस्थास देणगी म्हणून मिळाल्यावर त्याने ते पुन्हा वसविले.[७] नशिराबाद शके १७२३ (इ. स. १८०१) नंतर काही वर्षे पुरंधरे यांचे होते.[८] असा उल्लेख द. वा. पोतदार यांनी ही केला आहे.

नशिराबादचे देशमुख घराणे मुसलमान होते. १९३६ मधील नशिराबादचे काझी सय्यद तफज्जूलअली यांच्याजवळील सनद पुस्तकातील कागदपत्रानुसार काझी घराण्याचे पूर्वज सय्यद अब्दुल है यांना हिजरी १०४६ मध्ये शहाजहानने मोअतांसिब नेमले असे दिसते. पुढे हिजरी १०७३ पाच-दहा जमादिलावल महिन्याच्या मोअज्जमच्या फर्मानावरून सदरील अब्दुल है यांचे चिरंजीव सय्यद मोहमंद यास काजी नेमले असे दिसते. पुढे पहिला महमंद बादशहा यांच्यातर्फे निजाम उल्मुख याने महमद याचा मुलगा फखरुदीन यास हिजरी ११४१मध्ये सनद करून दिली आहे. (हिजरी १०७३ मधील) फर्मानान्वये काझी यास १८० बिघे जमीन दिलेली होती. मोअज्जमच्या हिजरी १०७३ मधील फर्मानानुसार नशिराबाद हे कसबा व परगण्याचे ठिकाण होते.अशी माहिती द. वा. पोतदारांच्या लेखात प्राप्त होते. कसबा म्हणजे असे ठिकाण की जेथे आठवडी बाजार भरतो व त्या ठिकाणी लोहार, सुतार, चांभार यासारखे कसबी - कारागीर लोक राहतात.[९] मुघल सम्राट शहाजहान व शहजादा मोअज्जम यांच्या फर्मानानुसार नशिराबाद गावावर मुघलांची कृपादृष्टी असावी.



Scanned with OKEN Scanner

**गावातील धार्मिक स्थळे :**

नशिराबादमध्ये हिंदु, मुसलमान, जैन अशा विविध धर्मांचे लोक गुण्या-गोविंदाने एकत्र राहतात. हिंदु धर्माच्या स्थळांमध्ये विठ्ठल मंदिर, राम मंदिर, सावता महाराज मंदिर, श्रीकृष्ण मंदिर, दत्त मंदिर, महादेव मंदिर, भवानी मंदिर, मुक्तेश्वर मंदिर, गणपती मंदिर, महालक्ष्मी मंदिर, निमजायमाता मंदिर, मरिमाता मंदिर आणि ऐतिहासिक प्रसिध्द १६ हनुमान मंदिरे ही आज अस्तित्वात आहेत.

वरील गणपती मंदिर हे अहिल्याबाई होळकर यांनी बांधले असल्याची माहिती ग्रामस्थ देतात. माळी वाड्यातील महादेवाचे आणि भानेश्वर महादेवाचे मंदिर प्राचीन असून हेमाडपंथी शैलीचे आहेत. गावामध्ये श्री दिगंबर जैन मंदिर आणि सूफी संत यासिन मियाँ रहेमान शहाचा दर्गा, काझी मशिद, मण्यार मोमीन मशिद, पीर शाबु मशिद व काळी मशिद आहे. गावातील बाळराजा मशिद ही हिंदु-मुस्लिम ऐक्याचे प्रतिक मानले जाते. ही मशिद एक राजपुत्राची समाधी असल्याची माहिती ग्रामस्थांकडून प्राप्त झाली.[१०]

**ग्रामदैवत संत श्री. झीपरू अण्णा महाराज:**

संत श्री. झीपरू अण्णा महाराज हे नशिराबादचे ग्रामदैवत मानले जाते. त्यांचा जन्म विणकाम करणाऱ्या साळी समाजातील गरीब कुटुंबात दि. १२ डिसेंबर १८७७ रोजी झाला. त्यांचा मृत्यु दि. २१ मे १९४९ रोजी झाला. त्यांच्या पुण्यतिथी निमित्त वैशाख वैद्य नवमीला उत्सव साजरा केला जातो. या उत्सवात भजन, पूजन, कीर्तन, नाटक, लोकनाट्य, कुस्ती अशा अनेक कार्यक्रमांचे आयोजन होत असे. गावातील सर्व जाती-धर्माचे लोकसमाधी मंदिरात जाऊन त्यांचे दर्शन घेतात.[११]

श्री झिपरू अण्णा वयाचे १०-१२ सुमारास श्री लक्ष्मिनारायण मंदिराचे श्री कल्याणदास महाराज यांचा अनुग्रह झाला. अनुग्रहानंतर श्री झिपरू अण्णा हे नेहमी चिंतनात मग्न असत. सर्वच धर्माचे लोक त्यांना प्रेमाने व आदराने पाहत असत. त्यांना वाचासिद्धी होती. तसेच भविष्याच्या घटनाही त्यांना समजत. श्री गणेशपुरीचे श्री मुक्तानंद स्वामींनी १४ वर्षापर्यंत नाशिराबादेस येऊन-जाऊन श्री अण्णांची सेवा केली. नशिराबाद (ता.जि-जळगाव) येथे ग्रामपंचायत कार्यालयाच्या मागे, वाकी नदीच्या काठी श्री झिपरू अण्णा महाराजांचे भव्य स्मारक बांधण्यात आले आहे. अण्णांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा कानळदा येथील कन्वाश्रमाचे तपोनिष्ठ स्वामी श्री चंद्रकिरणजी यांचे शुभहस्ते गुरुवार माघ व. ३ दि १५ फेब्रुवारी १९७९ रोजी उत्तरा नक्षत्रावर करण्यात आली. यावेळी गावातुन मूर्तीची सवाद्य मिरवणुक काढण्यात आली. सचिन भानुदास भोळे यांनी सदर समाधी दि २८ मार्च १९९२ रोजी बांधली. त्यानंतर सन २००३ मध्ये स्मारकाचा जीर्णोद्धार करण्यात आला.[१२]

संत श्री झिपरू अण्णा महाराज यांच्या ७५ व्या पुण्यतिथी सोहळयास २५ मे २०२४ पासून सुरुवात झाली. तसेच श्रीमद् भागवत कथेला व विविध धार्मिक कार्यक्रमाला सुरुवात झाली आहे. २५ मे ते १ जून २०२४ दरम्यान पुण्यतिथी सोहळा साजरा झाला. कथा निरूपण वैष्णव आचार्य पंडित राजेश महाराज, बीड सिंगाजी खंडवा (मध्य प्रदेश) यांनी केले. सप्ताहात दररोज संध्याकाळी ७ ते १० या वेळेत कथानिरूपण होत आहे. २५ मे रोजी सकाळी श्रींची महापूजा व ध्वजारोहण होऊन यात्रेला सुरुवात होत होती. ३० मे रोजी संत झिपरू अण्णा महाराज पोथीचे सकाळी ९ वाजता सामदायिक पारायण झाले. श्री झिपरू अण्णा महाराज



Scanned with OKEN Scanner

पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त सकाळी श्रींची महापूजा, सत्यनारायण पूजन होऊन पालखीची मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर भजन व महाआरती, महाप्रसाद वाटप करण्यात आला.[१३]

**खंडेराव महाराज यात्रोत्सवानिमित्त बारागाड्या:**

नशिराबाद गावातील खंडेराव महाराज यात्रोत्सवाला द्विशतकी परंपरा आहे. श्री. खंडेराव महाराज यांचा यात्रोत्सव यंदा दि.२३ ते २६ एप्रिल २०२४ दरम्यान साजरा करण्यात आला. चार दिवस चालणाऱ्या या उत्सवात बारागाड्या ओढणे, कठडे मिरवणूक, लोकनाट्य इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सुनसगाव रस्त्यावर श्री. खंडेराव महाराज यांचे पुरातन मंदिर आहे. निमित्त विविध कार्यक्रम घेण्यात येतात. यंदा दि. २३ एप्रिल २०२४ रोजी मंगळवारी श्रीची पूजा व अभिषेक आणि सायंकाळी सत्यनारायणाचे पूजन झाले. २४ एप्रिल रोजी महाअभिषेक पूजन आणि कठडे मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर सायंकाळी भगत युवराज धोबी यांच्या हस्ते बारागाड्या ओढण्याचा कार्यक्रम पार पडला. रात्री लोकनाट्याचा कार्यक्रम झाला. २५ व २६ एप्रिल रोजी सकाळी श्रीची मूर्तीस पंचामृत अभिषेक पूजन करण्यात आले.

दोनशे वर्षापासून नशिराबाद गावातील धोबी घराण्याकडे बारागाड्या ओढण्याचा मान आहे. चैत्र वाद्य प्रतिपदेला श्री. खंडेराव महाराज यात्रोत्सवानिमित्त बारागाड्या ओढण्याची परंपरा आहे. पिढ्यानपिढ्या हि परंपरा धोबी घराण्याने सांभाळलेली आहे. मागील दोन वर्षांपासून बारागाड्या ओढण्याची धूरा ही भगत युवराज मोतीलाल धोबी यांचेकडे आहे. श्री.खंडेराव महाराज यात्रोत्सव समितीला श्री. खंडेराव महाराज यात्रोत्सवास गावातील गणेश मंडळ, दुर्गा उत्सव मंडळ, भजनी मंडळ, नगरपालिका, नशिराबाद पोलीस स्टेशन यांचे अनमोल सहकार्य लाभते.[१४]

RESEARCH JOURNEY

**ज्ञानेश्वरी पारायण:**

नशिराबाद येथे गेल्या ३६ वर्षांपासून ज्ञानेश्वरी पारायणाचे आयोजन केले जात आहे. ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यात ह. प. भ. भरत महाराज, ह. प. भ. मंगेश महाराज, ह. प. भ. प्रभाकर महाराज, ह. प. भ. सुनील शास्त्री महाराज, ह. प. भ. सुधाकर महाराज, श्री. किशोर पाटील, श्री. संजय माळी यांनी भाविकांना विविध सामाजिक विषयांवर मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी सादर केलेल्या भजनाने कार्यक्रमात रंगत आणली होती. आठवडाभर चालणाऱ्या पारायण सोहळ्याची भव्य शोभायात्रा काढून सांगता करण्यात आली. शोभायात्रेनिमित्त गावात ठिकठिकाणी आकर्षक रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. तसेच संत गोरा कुंभार, संत ज्ञानेश्वर, मुक्ताई, राधाकृष्ण, तुकाराम महाराज आदींच्या सजीव आरास करण्यात आल्या होत्या. अग्रभागी श्रींची पालखी सजवण्यात आली होती. त्यात श्रींची प्रतिमा, ग्रंथ ठेवला होता. विविध जाती-पातीचे, धर्मांचे, राजकीय पक्षांचे कार्यकर्ते सर्व प्रकारचे भेद विसरून फुगड्या खेळताना दिसले. पारायण समापतीच्या दिवशी वरण, पोळी, वांग्याची भाजी या पदार्थांचा महाप्रसाद सर्व भाविक भक्तांना वितरित करण्यात आला होता.[१५]

नशिराबाद येथील आठवडे बाजाराच्या प्रांगणात आठवडाभर झालेल्या ज्ञानेश्वरी पारायण झाले. शोभा यात्रेने, परायणाच्या उत्साहपुर्ण वातावरणाने आणि संत ज्ञानोबा माऊली आणि संत तुकारामा यांच्या



Scanned with OKEN Scanner

जयघोषाने नशिराबाद नगरी दुमदुमून गेली होती. यावेळी पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.[१६]

### सुफी संत यासिन मियाँ कादरी (रहे.) यांचा उरुस :

नशिराबाद मध्ये सुफी संत यासिन मियाँ कादरी (रहे.) यांच्या उरुस समारोहाची परंपररा १२५ वर्ष जुनी आहे. संत यासिन मियाँ हे संमतेची शिकवण देणारे व हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतिक मानले जातात. त्यांच्या उरुस समारोहासाठी मुबंई, भिवंडी, सूरत, अहमदाबाद, मालेगाव यासारख्या शहरातून भाविक नशिराबाद येथे येतात. गावात चौपाल मोहल्ला भागात पिर यासिन मियाँचा दर्गा आहे.[१७]

एका आख्यायिकेनुसार त्यांचे पूर्वज बगदाद शहरातून मानवतेचा प्रचार करण्यासाठी आले होते. त्यात यासिन मियाँचाही समावेश होता. ही आख्यायिका 'खरसीद दख्खन' या उर्दू ग्रंथात आढळते.[१८]

सुफी संत यासिन मियाँ कादरी यांचा मृत्यू जानेवारी १९७६ मध्ये झाला. त्यांच्या अंत्यदर्शनासाठी लोकांनी तीन दिवस मोठी रिघ लावली होती. तिसऱ्या दिवशी त्यांचा दफनविधी झाला. नशिराबादच्या चौपाल मोहल्ला भागात त्यांची मशीद आहे. मुस्लीमच नव्हे तर हिंदु धर्मीय व अन्य धर्मीय लोक सुध्दा या दर्याचे दर्शन घेतात. त्यावेळी गुलाब पुष्प व शिरनीचा प्रसाद अर्पण करतात. "सर्वांनी आपआपसात प्रेमभाव ठेवावा आपण सर्व परमेश्वराची लेकरे आहोत. परमेश्वराजवळ कुणीही लहान वा मोठा, उच्च निच असा भेदभाव नसतो. मानवसेवा ही सर्वात मोठी सेवा आहे." अशी त्यांनी शिकवण दिलेली आहे.[१९]

### बालाजी संस्थान :

नशिराबादमध्ये बालाजी देवस्थान आहे. त्या संस्थानचा कारभार एक बैरागीबुवा पाहतात. नशिराबादचे जहागीरदार आबासाहेब पुरंदरे यांनी पूर्वीचा भोगवटा पाहून सुहुर सीत असरिन मयातैन अलफमध्ये (सुहूर १२२६) दिलेल्या इनाम सनदेची प्रत बालाजी संस्थानच्या बैरागी बोवाजवळ अपूर्ण अवस्थेत आहे. तिच्यावर इंग्रज सरकारांत दाखल केल्याचे शेरे आहेत. (ता. ११ डिसेंबर १८२५) आणि सदरहु प्रमाणे अद्याप (सन १९३६) साली २५ रुपये इनाम सरकारातून देवालयास चालत आहे.[२०] असा उल्लेख द. वा. पोतदारांच्या लेखात मिळतो. यावरून पेशवेकाळापासून बालाजी संस्थानला मिळत असलेले सरकारी इनाम हे इंग्रज शासनाने ही सुरु ठेवले होते. इंग्रज शासनही धार्मिक स्थळांबाबत उदार दृष्टिकोन बाळगून असल्याचे स्पष्ट होते.

### निष्कर्ष:

नशिराबादचे ग्रामदैवत संत झिपरू आण्णा महाराज यांच्यावर गावातील हिंदू, मुसलमान, बौद्ध, जैन अशा सर्वधर्मीय लोकांची श्रद्धा आहे. हे सर्व धर्मीय लोक त्यांच्या पुण्यतिथी समारोहात सहभागी होतात. त्यांच्या समाधीवर दर्शनासाठी जातात. नशिराबाद गावांमध्ये सुफी संत पीर यासीन मिया यांच्या उरूस समारोहाची सव्वाशे वर्षांची परंपरा आहे. सुफी संत पीर यासीन मिया यांनी गावातील सर्व धर्मीयांना समान वागणूक दिल्याने त्यांच्या उरूस समारोहात सर्व जाती-धर्माचे लोक सहभागी होतात. त्यांचा उरूस समारोह म्हणजे हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक मानले जाते. तसेच नशिराबाद गावात मागील दोनशे वर्षांपासून खंडेराव महाराज यात्रा उत्सवानिमित्त बारागाड्या ओढण्याची अखंड परंपरा आहे. नशिराबाद गावात मागील ३६ वर्षांपासून ज्ञानेश्वरी पारायणाचे आयोजन केले जाते. त्यामुळे गावातील धार्मिक व आध्यात्मिक वातावरण टिकून राहत आहे. गावातील सर्व लोक एकत्र येऊन आठवडाभर गुण्यागोविंदाने पारायणाचा आनंद घेतात.


Scanned with OKEN Scanner

नशिराबाद गावातील धार्मिक परिस्थितीचे ऐतिहासिक अध्यायानंती नशिराबाद गावाला मध्ययुगीन काळापासून धार्मिक, आध्यात्मिक व सांस्कृतिक वारासा असल्याचे दिसून येते.

**संदर्भ :**


१. Census of India 2011, Maharashtra, Part Xii - B, District Census Handbook, Jalgaon, Village and Town Wise Primary Census Abstract, Directorate of Census Operations Maharashtra.
२. श्री. जितेंद्र महाजन, ग्रामस्थ, नशिराबाद यांनी दिलेली माहिती.
३. श्री. बंडू खंडारे, ग्रामस्थ, नशिराबाद यांनी दिलेली माहिती.
४. श्री. दिनेश नारखेडे, ग्रामस्थ, नशिराबाद यांनी दिलेली माहिती.
५. चौधरी, कि. का. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर जळगाव जिल्हा, मुंबई, मराठी आवृत्ती (सुधारित), १९९४, पृ. ७७३
६. श्री. सुनील महाजन, ग्रामस्थ, नशिराबाद यांनी दिलेली माहिती.
७. चौधरी, उपरोक्त, पृ.७७३
८. पोतदार, द. वा., नशिराबादेची ऐतिहासिक पाहणी, त्रैमासिक, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, वर्ष १७ वे, अंक ४, वा मार्च १९३७, पृ. १३१
९. कित्तहातमाग, बांगडी व्यवसायाचे नशिराबाद, विश्वनाथ महाजन, दैनिक लोकमत, ५ जून २०१०
१०.श्री. सुनील महाजन, ग्रामस्थ, नशिराबाद यांनी दिलेली माहिती.
११.https://www.ziparuanna.com/shri-ziparu-anna-maharaj.php
१२.दैनिक लोकमत, २६, २८ आणि ३१ मे २०२४ जळगाव सिटी पुरवणी,
१३.दैनिक दिव्य मराठी, २६ व ३१ मे २०२४
१४.सुनील महाजन, ग्रामस्थ, नशिराबाद यांनी दिलेली माहिती.
१५.दैनिक दिव्य मराठी, जळगाव सिटी पुरवणी, ३१ जानेवारी २०२४
१६.दैनिक पुण्यनगरी, ३० जानेवारी २०२४
१७.सय्यद बरकत अली, ग्रामस्थ, नशिराबाद यांनी दिलेली माहिती.
१८.नितीन नांदूरकर यांचा लेख, सांजदैनिक साईमत, शुक्रवार, दि १६ जाने २०१५
१९.नशिराबाद विशेषांक,साईमत, सोमवार, दि. २७ जानेवारी २०१४
२०.पोतदार, द. वा., नशिराबादेची ऐतिहासिक पाहणी, उपरोक्त, पृ. १३०


**(आर्थिक साहाय्य - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ, जळगाव)**



Scanned with OKEN Scanner